सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/2568
दिनांक :- 03 OCT 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/खाजगी विना-अनुदानित,
पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शिक्षक विधान परिषद मतदार संघाकरिता नोंदणीबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. अपर आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र. अआ(सा प्र) / जी बी ४/शिक्षक मतदारसंघ/ प्र.क्र.२९६/२०२५ दिनांक १/१०/२०२५.
२. मा.डॉ. अनिल बोंडे, खासदार (राज्यसभा) यांचे पत्र क्र. व्हिआयपी/१०५३/२०२५ दि. २८/९/२०२५.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने मा.डॉ. अनिल बोंडे, खासदार (राज्यसभा) यांचे संदर्भीय पत्र यासोबत संलग्नीत करुन पाठविण्यात येत आहे. सदर पत्रानुसार शिक्षक विधान परिषद मतदार संघाकरीता नोंदणी करतांना अनेक वेळा बोगस मतदारांची नोंदणी केली जात असल्याबाबत, जे शिक्षक शासनाकडून मान्यता प्राप्त नाही असे शिक्षकांची सुध्दा नोंदणी केली जाते. तसेच अनेक वेळा संस्थेच्या माध्यमातून लेबॉरटरी टेक्नीशियन, चपराशी स्तरावरचे लोक सुध्दा नोंदल्या जात असल्याबाबत नमुद केले आहे. यामुळे शिक्षक मतदार संघाच्या नव्याने तयार करणेत येत असलेल्या मतदार यादीमध्ये अपात्र व्यक्तींची मतदार म्हणून नोंद न करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

तेव्हा आपल्या संस्थेकडून पात्र व्यक्तीना प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे तसेच संस्थेकडून चुकीचे किंवा खोटे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात आल्यास किंवा चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिल्याचे आढळून आल्यास लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० चे कलम ३१ नुसार आपल्यावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती

**प्रत :-** १. मा. अपर आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता सादर.
२. प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.